बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ३८ | बुधवार,दि. ३० ऑगस्ट २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## मग्रारोहयोच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यास प्रशासनाची टाळाटाळ

### जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समिती सभापतींच्या पत्रावर मंत्रालयाने घेतला बदलीचा निर्णय




**गोंदिया:–** ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयातील रोहयो विभागामार्फत केंद्र सरकारची महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यात येते. सध्या घडीला या योजनेचे नियंत्रण जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असून जि.प.मध्ये याकरिता स्वतंत्र विभाग कार्यरत शासनाने केलेला आहे. या योजनेतील तांत्रिक बाबी हाताळण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून कंत्राटी अभियंत्यांची नेमणूक केली जाते. अशा कंत्राटी अभियंत्यांना एकाच ठिकाणी दीर्घकाळ ठेवता येत नसल्याच्या सरकारचा आदेश आहे. त्या शासन निर्णयाचा आधार घेत आणि कर्मचाऱ्यांची बदलीची मागणी बघून जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्यासह पंचायत समितीच्या सभापतींनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मग्रारोहयो यांच्याकडे पत्र व्यवहार करुन बदल्या करण्याची विनंती केली होती. त्या पत्रांचा संदर्भ व शासन निर्णयाचा संदर्भ घेत सहायक संचालक नियोजन विभाग (रोहयो) मुंबई यांच्याकडे जिल्हा परिषदेचे कार्यक्रम समन्वयकांनी पत्र व्यवहार केला होता. त्या पत्र व्यवहाराला ग्रांभीर्याने घेत सहायक संचालक नियोजन विभाग यांनी गोंदिया जिल्ह्यातील मग्रारोहयो अंतर्गत येत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मंजूरी दिली. तसेच बदली पात्र कर्मचाऱ्यांची यादी २४ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेला पाठविली. मात्र या पत्राला पाच दिवसाचा कालावधी लोटूनही जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या बदली यादींनुसार आदेश न काढल्याने मंत्रालयातील शासकीय आदेशाला वाटाण्याच्या अक्षता लावून या मग्रारोहयो कर्मचारी व अभियंत्यांच्या बदल्या रोखून धरत भ्रष्टाचाराच्या राक्षसाला खतपाणी घालण्याचे काम होत असल्याची टिका होवू लागली आहे.

केंद्र सरकार अनुदानावर चालविण्यात येणाऱ्या मनरेगा योजनेमध्ये तांत्रिक कामे करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून कंत्राटी अभियंत्यासह इतरही पदे भरली गेली आहेत. ही पदे कंत्राटी स्वरूपातील असली तरी या कर्मचाऱ्यांना एकाच ठिकाणी अधिक काळ कार्यरत न ठेवता त्यांच्या बदल्या इतर ठिकाणी करण्याच्या राज्य सरकारच्या सूचना आहेत. नियोजन विभागाचे तत्कालीन उपसचिव प्रमोद शिंदे यांनी १० एप्रिल २०१७ रोजी सर्व जिल्हाधिकारी, सीईओ व जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला बदल्यासंदर्भात पत्र दिले होते. त्यानंतर अनेक पत्र मंत्रालयातून निघाले मात्र त्या पत्रांवर ६ वर्षाचा कालावधी लोटूनही गोंदियासह राज्यातील एकाही जिल्हाधिकारी कार्यालयाने कारवाई न करता या पत्राला केराची टोपली दाखविल्याचे समोर आले.

या ६ वर्षाच्या काळात पहिल्यांदाच मंत्रालयातून बदलीपात्र कर्मचारी व अभियंत्यांची यादी प्रकाशित होवूनही त्यावर अमलबजावणी करायला जिल्हा परिषद प्रशासन का? मागे-पुढे बघते असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. एकीकडे बदलीकरिता इच्छूक कर्मचारी जिल्हा परिषद अध्यक्षांपासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सातत्याने चकरा मारत आहेत मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन एकाच ठिकाणी अनेक वर्ष कार्यरत राहून कंत्राटी नौकरी सोबतच ठेकेदारी सुरु केलेल्यांना एकप्रकारे जिल्हा परिषद प्रशासन बदली आदेशांना थांबवून सहकार्यच करित असल्याची प्रतिक्रीया उमटू लागली आहे.

गोंदिया जिल्ह्याचा विचार केल्यास २००७-०८ पासून ते तीन एनजीओच्या माध्यमातून कंत्राटी कर्मचारी व अभियंत्यांची भरती करून पंचायत समिती स्तरावर नियुक्त करण्यात आले. यामध्ये जे बेरोजगार अभियंते कंत्राटी अभियंते म्हणून रुजू झाले, त्यांना बेरोजगार अभियंत्यांचे नोंदणी असलेली कामे करता येत नाही. परंतु, जिल्ह्यातील पंचायत समितीअंतर्गत कार्यरत अनेक तांत्रिक अभियतांनी कंत्राटी अभियंत्याच्या नोकरीसह खासगी कंत्राटाची कामे अधिकाऱ्यांच्या संगनमताने बिनधास्तपणे करण्यास सुरवात चित्रे जिल्ह्यात आहेत. या अभियंत्याच्या अनेक तक्रारी असतानाही पंचायत समितीचे स्थानिक पदाधिकारी, मग्रारोहयोचे अधिकारी यांनी अप्रत्यक्ष पाठिंबा दिल्याची चर्चा आहे. एकाच पंचायत समितीमध्ये ७ ते ८ वर्षापासून हे कंत्राटी अभियंते कार्यरत असल्याने त्यांचे हितसंबंध स्थानिक नेत्यांशी व कंत्राटदारांशी जोडले गेल्याने गैरव्यवहाराची चांगलाच बोकाळला आहे. त्यामुळे पंचायत समिती स्तरावर या कंत्राटी अभियंत्यासह कृषी तांत्रिक अधिकारी यांच्या बदल्या करण्याची मागणी सातत्याने होत होती. त्यानुसार जिल्हा परिषद अध्यक्षांनी बदल्यांकरिता पुढाकार घेतला आणि त्यांच्या या पुढाकारामुळे मंत्रालयाने बदलीचे आदेश ही काढले. मात्र जिल्हा परिषदेचे अधिकारी त्या आदेशाला केराची टोपली दाखवून राज्यमंत्र्याचा दर्जा असलेल्या जिल्हा परिषद अध्यक्षाच्या या प्रयत्नालाही हरताळ फासायला लागले आहेत.

जेव्हा की शासनाचे धोरण दर तीन वर्षानी बदली करण्याचे आहेत. तीन वर्षानी बदली करण्याचे धोरण असताना मग्रारोहयोच्या अधिकाऱ्यांनी या कंत्राटी अभियंत्यांना १० ते १२ वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत ठेवण्यामागचे धोरण काय? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. तर जे कर्मचारी बदलीसाठी डोळे लावून बसले आहेत त्यांना जिल्हाधिकारी न्याय देणार की डोळ्यावर पट्टी बांधून आंधळ्याची भूमिका निभावणार? याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

## करंट लावून देवरी तालुक्यातील वडेगाव परिसरात तीन बिबट्यांची शिकार



**गोंदिया:–** देवरी -आमगाव मार्गावरील देवरी वनपरिक्षेत्रातील एफडीसीएमच्या बोरगाव बिटमध्ये सीएन ४८१ तीन( १ मादा व २ निमवयस्क नर बछडे) बिबटांची करंट लावून शिकार केल्याची घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणात वनविभागाने चौघांना ताब्यात घेत त्यांना अटक केली आहे.रानडुकराच्या शिकारीकरीता विद्युतप्रवाह लावल्याचे कबूल केले.मृत बिबट्यावर जंगलपरिसरात अग्नीदाह करण्यात आले. सोमवारच्या रात्री ९.३०वाजता काही गावकऱ्यांनी या घटनेची माहिती वनविभागाला दिली.माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान दोन्ही बिबट्यांची शिकार विद्युत करंट लावून शिकारीच्या दृष्टीने केल्याचे प्राथमिक तपासात पुढे आले.आज मंगळवारला (दि.२९) परत सकाळी वन विभागाच्या पथकाने जंगल परिसराची पाहणी केली असता तिसरा बिबट ही मृतावस्थेत आढळला. या तीनही बिबट्यांना तीन ते चार दिवसापुर्वी मारण्यात आल्याचा अंदाज आहे. ज्या ठिकाणी बिबट्यांची शिकार करण्यात आली तो जंगल परिसर एफडीसीएमच्या ल.प.५८९ वडेगाव बिट सिमेला लागून आहे.या घटनेचा तपास करीत असताना वनविभागाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे चौकशी करिता संशयीत ४ आरोपींना अटक करुन चौकशी सुरु केली.त्यामध्ये दशरथ ब.धानगाये मेहताखेडा,अरुण राऊत भोयरटोला,देवराज मानकर बेलघाट व भाऊलाल राऊत भोयरटोला यांचा अटक केलेल्यामध्ये समावेश असून त्यांनी २५ ऑगस्ट रोजी १९०-२०० मीटर विद्युत प्रवाह रानडुकराच्या शिकारीकरीता लावल्याचे कबूल केले.त्यात या बिबट्यांचा करंट लागून मृत्यू झाला असून अजून काही आरोपींचा समावेश होण्याची शक्यता आहे.घटनास्थळावर सहाय्यक व्यवस्थापक ए.एस.देशमुख, विभागीय व्यवस्थापक संतोष टी.धांदिले,सहाय्यक वनसरंक्षक गोवर्धन राठोड,मानद वन्यजीव सावन बहेकार,मुकूंद धुर्वे,वनपरिक्षेत्रधिकारी सचिन धात्रक,डी.बी.नागदेवे व वनविभागाचे कर्मचारी उपस्थित होते.



विशेष मागील यापुर्वी सालेकसा तालुक्यात वाघाच्या शिकार प्रकारची काही लोकांना ताब्यात घेण्यात आले होते. आदिवासी व नक्षलग्रस्त असलेल्या सालेकसा, देवरी तालुक्यात वाघ आणि बिबट्यांची होत असलेल्या शिकारीमुळे वन्यप्राण्यांची सुरक्षीतता धोक्यात आली आहे.




# राखेपासून खत निर्मिती करण्याचा भजेपार ग्रामसभेचा निर्णय

## माझी वसुंधरा अभियानाला बळकटी देण्याचा प्रयत्न

## ओबीसी जनगणनेचा ठराव पारित

**ग्राम सभेत अनेक महत्त्वपूर्ण ठराव पारित करण्यात आले यात प्रामुख्याने शासनाने ओबीसींची जातनिहाय गणना करावी, जिल्हा परिषद शाळांमध्ये तत्काळ शिक्षक भरती करावी, भजेपार - धानोली मार्गावरील वाघ नदीवर पूल बांधण्यात यावा या मागण्यांचे ठराव पारित करून शासनाला पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. सोबतच टॅक्स वसुलीला गती देण्यासाठी १०० टक्के कर वेळेत भरणाऱ्यांसाठी लकी ड्रॉ राबवून प्रेरनात्मक बक्षिसे देण्याचा निर्णय घेण्यात आला.**



**सालेकसा:** अंत्यविधीनंतर संपूर्ण राख नदीत विसर्जित न करता त्या राखेला एका विशिष्ट टाकीत संग्रहित करून खत निर्मिती करण्याचा आणि त्याचा उपयोग वृक्षारोपणासाठी करून कालवश झालेल्या व्यक्तीच्या आठवणीत स्मृतीवन साकारण्याचा पुरोगामी आणि तेवढाच क्रांतिकारी निर्णय सालेकसा तालुक्यातील भजेपार ग्राम सभेने पारित केला आहे. स्मशानाचं सोनं करणाऱ्या या ठरावाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.

सरपंच चंद्रकुमार बहेकार यांच्या अध्यक्षतेखाली २५ ऑगस्ट रोजी ग्राम सभा पार पडली यावेळी त्यांनी माझी वसुंधरा अभियानाला बळकटी देण्यासाठी राखेपासून खत निर्मिती आणि त्यातूनच स्मृतिवन साकारण्याची संकल्पना ग्रामस्थांपुढे ठेवताच एकसुराने हा ठराव पारित करण्यात आला. यावेळी ग्राम सेवक रितेश शहारे, ग्राम पंचायत सदस्य रवीशंकर बहेकार, रेवतचंद बहेकार, राजेश बहेकार, मनीषा चुटे, सरस्वता भलावी, आशा शेंडे, आत्माराम मेंढे, ममता शिवणकर, रोजगार सेवक गोपाल मेंढे, संगणक परिचालक अखिलेश बहेकार आदी सहित मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव असलेले भजेपार गाव लोक सहभागासह अनेक सेवाभावी, क्रीडा, शिक्षण आणि अध्यात्मिक उपक्रमांसाठी पंचक्रोशीत प्रसिद्ध असून या आगळ्या वेगळ्या निर्णयाने पुन्हा एकदा या गा-वाने पुरोगामित्व सिद्ध केल्याचे बोलले जात आहे. या निर्णयानंतर नदीपात्रात राख विसर्जित करण्याच्या परंपरेला तिलांजली वाहत अंत्यविधीच्या राखेतून खत निर्मिती करत याच खतापासून स्मृति वनातील वृक्षांना जैविक खतांचा पुरवठा केला जाणार आहे. अग्निदाह नंतर जवळपास शरीराच्या वजनाची ३.५ टक्के राख उरते, जी सर्वसाधारण २.५ ते ३.० किलो भरते. ज्यामध्ये सर्वाधिक कार्बन आणि कॅल्शियम फॉस्फेट चे प्रमाण असते. यासोबतच या राखेत खनिज, पोटॅशियम क्षार, सोडियम क्षार आणि सल्फर चे प्रमाण आढळून येते. हे सर्व रासायनिक गुणधर्म वृक्षांच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. कार्बनमुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो ज्याअर्थी जमिनीची सुपीकता वाढते.

# पूर परिस्थिती नियमित सराव प्रशिक्षण



**गोंदिया :** जिल्ह्यात पूर परिस्थितीला सक्षमपणे तोंड देण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गोंदिया तर्फे पूर परिस्थितीमध्ये शोध बचाव कार्य करण्याकरिता वापरात येणाऱ्या बोटींची व ओ.बी.एम (बोटीचे इंजिन) तसेच इतर आवश्यक साहित्यांची चाचणी गोरेगाव येथील कटंगी डॅममध्ये दि.२६ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हा शोध व बचाव पथकामार्फत करण्यात आली.

यापूर्वी जिल्ह्यात आलेल्या पूर परिस्थिती लक्षात घेऊन यावर्षी जिल्हा प्रशासनाकडून पूर परिस्थितीमध्ये जीवित व वित्तीय हानीचे प्रभाव कमी करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गोंदिया मार्फत जनजागृतीचे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने नागरिकांना पूरपरिस्थितीमध्ये तात्काळ मदत पुरविण्यासाठी जिल्हा शोध व बचाव चमू तर्फे नियमित सराव प्रशिक्षण कार्यक्रमाचे देखील आयोजन कटंगी जलाशय येथे करण्यात आले.

जिल्ह्यातील ९६ गावांना पुराचा संभाव्य धोका आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत पूरपरिस्थिती दरम्यान शोध व बचाव कामात उपयोगी पडणारे रबर/फायबर बोटी, लाइफ जॉकेट, लाइफ बॉय, इमरजेंसी लाईट, जइच मशीन, टाकाऊ वस्तूंपासून तयार करण्यात आलेले फ्लोटिंग डिवाइस, सर्चलाईट इत्यादी सर्व साहित्यांचे चाचणी करुन कार्यरत असल्याची खात्री करण्यात आली आहे.

गोरेगाव येथील कटंगी जलाशय येथे शोध बचाव पथकाचे सदस्य नरेश उईके, जसवंत रहांगडाले, रविंद्र भांडारकर, संदीप कराडे, दिनू दिप, राजाराम गायकवाड, दुर्गाप्रसाद गगंगापारी, इंद्रकुमार बिसेन तसेच अग्निशम विभागाचे सहाय्यक अग्निशमन अधिकारी लोकचंद भेंडारकर व चमू प्रामुख्याने सराव करिता उपस्थित होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकाद्वारे पूर परिस्थिती दरम्यान करण्यात येणारी कामे, नागरिकांना सुरक्षित हलविण्याकरिता करण्यात येणारी उपाययोजना, जिल्हा नियंत्रण कक्षाचे संचालन, मानक कार्यपद्धती (SOP) व पूर दरम्यान संबंधित सर्व विभागांचे समन्वय इत्यादी बाबत आवश्यक तयारी करण्यात आली आहे.

# ग्रामसभेच्या ठराव असेल तरच मिळणार घरभाडे भत्ता

## शिक्षक व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे अनिवार्य, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काढले पत्र



**गोंदिया:** शिक्षक व कर्मचाऱ्यांना मुख्यालयी रा-हणे अनिवार्य आहे. पण बरेच कर्मचारी मुख्यालयी न राहता खोटे प्रमाणपत्र जोडून घरभाडे भत्याची उचल करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान, या प्रकाराला चाप लावण्यासाठी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी नुकतेच एक पत्र काढले आहे. त्यानुसार शिक्षक व इतर कर्मचारी हे मुख्यालयी राहत असल्याचा ठराव ग्रामसभेत घेऊन त्या ठरावाची प्रत जमा केल्यावर घरभाडे भत्ता कर्मचाऱ्यांच्या वेतनात जमा करण्याचा निर्णय घेतला. यामुळे अनेक कर्मचाऱ्यांची झोप उडाली आहे.

शासन परिपत्रकानुसार प्रशासनच्या घरभाडे भत्ता मिळविण्यासाठी कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील सुधारित शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेतील ग्रामसेवक शिक्षक व संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांची मुख्यालयी राहण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी प्राथमिक शिक्षक पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सहायक मुख्यालयी राहत असल्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींचा ग्रामसभेचा ठराव बंधनकारक करण्यात आला आहे.

शासन परिपत्रकाप्रमाणे शिक्षक कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहत असल्याचा संबंधित ग्रामपंचायतच्या ग्रामसभेचा ठराव सादर करणे बंधनकारक केले आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार शिक्षक, कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहत असल्यासंबंधी ग्रामसभेचा ठरावाची प्रत द्यावी लागणार आहे. जे कर्मचारी ही प्रत सादर करतील त्याच कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता दिला जाणार आहे. जे कर्मचारी ठरावाची प्रत सादर करणार नाहीत. त्या कर्मचाऱ्यांचा ऑगस्ट २०२३ पासून घरभाडे भत्ता काढू नये, असे निर्देश जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, प्राथमिक यांना दिले आहेत. यामुळे शिक्षक व कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### गावात राहतील आता पूर्णवेळ कर्मचारी

**या निर्णयाची गावपातळीवर अंमलबजावणी कशी होते, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे गावाच्या सेवेकरिता असलेले वर्ग तीनचे कर्मचारी पूर्णवेळ गावी उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे.**

### अप-डाऊन करणाऱ्यांच्या समस्येत भर

**अनेक कर्मचारी मुख्यालयी न राहता अप-डाऊन करीत होते. मात्र यामुळे गावकऱ्यांची अनेक कामे होत नसल्याचे दिसून येत होते. मात्र, शासनाच्या या निर्णयामुळे आता कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहूनच कामे करावी लागणार आहेत. तसेच ग्रामसभेचा ठराव घेणे आवश्यक करण्यात आल्याचे कर्मचाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे.**

# तिरखेडी येथे आता होणार ओबीसी जातनिहाय जनगणना



**सालेकसा :** - राज्यातच नव्हे तर देशात गेल्या काही वर्षापासून सातत्याने ओबीसी समाजातील जातींची जनगणना करण्याची मागणी करण्यात येत आहे.मात्र केंद्रसरकारने जनगणना करण्यास नकार दिल्यानंतर आत्ता गावखेड्यातील ग्रामपंचायतीनीच आपल्या स्तरावर ओबीसींची जनगणना करण्याचा ठराव पारित करुन जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे.

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातंर्गत येत असलेल्या ग्राम पंचायत तिरखेडी येथील २२ आँगस्ट रोजी आयोजित ग्रामसभेत सरपंच प्रिया मनोज शरणागत यांचे अध्यक्षतेख़ली ग्रामपंचायत स्तरावरङ्घओबीसी जातनिहाय जनगणनाङ्घ करण्याचे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. १९३१ च्या नंतर आजपर्यंत ओबीसी ची जातनिहाय जनगणना झाली नाही. याकडे सर्व सरकारे दुर्लक्ष करतात. केन्द्रच्या गृहखातेद्वारे ही जनगणना केली जाते. राज्यसरकारनेही जनगण-नेचा ठराव विधानंमंडळात पारीत केला,मात्र राज्यसरकारनेही याकडे लक्ष दिले नाही. ओबीसींची जनगणना करण्यास कुणीच तयार होत नसल्याने थेट ग्रामपंचायत स्तरावर ही जनगणना करण्यासाठी सदर ठराव ग्रामसभेत ठेवून सर्वसमतीने पारित करण्यात आल्याची माहिती सरपंच प्रिया मनोज शरणागत यांनी दिली.

# कंत्राटी सेविकेवर ५ गावांची धूरा




**अर्जुनी मोरगाव:-** तालुक्यातील राजोली उपकेंद्रात केवळ एकमेव कंत्राटी आरोग्य सेविका कार्यरत असून जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अती दुर्लक्षितपणामुळे आरोग्य सेवेकडे दुर्लक्ष झाले आहे. आरोग्य उपकेंद्र परिसरातील पाच महसूली गावांसह अंतर्गत येणाऱ्या वाड्या अशा हजारो नागरिकांच्या आरोग्याचा भार एका कंत्राटी आरोग्य सेविकावर असल्यामुळे विशेषत: गरोदर मातेसह किरकोळ उपचार घेणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील राजोली येथे आरोग्य उपकेंद्राची प्रशस्त इमारत असून एका स्थायी आरोग्य सेविका व आरोग्य सेवक आणि कंत्राटी आरोग्य सेकि अशी पद निर्मिती आहे. मात्र येथील स्थायी आरोग्य सेविकेचे स्थानांतरण केले. त्या बदल्यात स्थायी आरोग्य सेवीकेची व्यवस्था केली नाही. तर आरोग्य सेवक प्रशिक्षणास गेल्याने अनेक दिवसांपासून सगळा भार एकट्या कंत्राटी आरोग्य सेविकेवर आला अहे. परिणामी आरोग्य सेविकेवर भरनोली, खडकी शिवरामाटोला, बलीटोला, तिरखुडी आणि नागनडोह येथील आरोग्य से-वेचा भार पडत आहे. यामुळे नागरिकांची चांगलीच कोंडी होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत.

यात अधिकाधिक प्रमाणात लसीकरण सर्वे आणि गाव-ागावात घरोघरी फिरुन दौरे करणे आवश्यक असते. अश-ावेळी एकट्या कंत्राटी आरोग्य सेविकेला उपकेंद्रातील रुग्णांना सेवा आणि इतर कामांना न्याय देताना कसरत करावी लागत आहे.

जि.प.च्या आरोग्य विभागाने लक्ष केंद्रीत करुन तातडीने रिक्त जागा भरून आरोग्य सेवा सुरळीत करावी अन्यथा नाममात्र उपकेंद्र ठेवण्यापेक्षा बंदच करा अशी संतापजनक प्रतिक्रीया नगारिकांमधून येत आहे.

# पती व सासूची गर्भवती महिलेला मारहाण; नवजात बाळ दगावले

**गोंदिया :** कौटुंबिक वादातून पती व सासूने गर्भवती सूनेचा छळ केला. त्यामुळे प्रसुती होऊन नवजात बाळ दगावल्याची घटना घडली. याबाबत महिलेने पोलिसांना दिलेल्या माहितीवरुन तिरोडा पोलिसांनी पती व सासूवर गुन्हा दाखल केला आहे.



तिरोडा तालुक्यातील येडामाकोट येथे सावन सुनील मुटकुरे (वय २८) ही गर्भवती असताना २५ ऑगस्ट रोजी पती सुनिल मुटकुरे व सासू हिरामोती मुटकुरे यांनी तू घरचे काम करत नाही, आपल्या वडीलांना पैसे देते व इतर घाणेरडे आरोप करून शारीरिक व मानसिक छळ केला.

सततच्या भांडणामुळे पीडित महिला घर सोडून जाण्यास निघाली. तेव्हा तिच्या सासूने काठीने पाठ, पाय व मानेवर मारले. तसेच पती सुनिल यानेस-ुद्धा तिच्या मानेवर थापड व पाठीवर बुक्की मारली. या मारहाणीमुळे गर्भवती महिलेला त्रास सुरू झाला. त्यामुळे तिच्या पतीने मुंडीकोटा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. नंतर पुढील उपचारासाठी तुमसर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेव्हा तेथील डॉक्टरांनी महिलेची परिस्थीत बघून लवकर प्रसुती होऊ शकते, असे सांगितले.

त्यामुळे पती सुनिल याने गोंदिया येथे बाई गंगाबाई महीला रुग्णालय मध्ये भरती केले.२६ ऑगस्ट रोजी प्रसुती होऊन बाळाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याबाबत पीडित महिला सावन मुटकुरे हिला गर्भवती असताना सासू व पतीने मारहाण केल्यामुळे तिचे बाळ दगा-वले असे पोलिसांना सांगितले. त्यावरुन तिरोडा पोलिसांनी सासू व पतीवर गुन्हा दाखल केला आहे.

तिरोडा पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून आम्ही गंगाबाई रुग्णालयातील तिची प्रसूती करणाऱ्या डॉक्टरांच्या वैद्यकिय अहवालाची प्रतीक्षा करीत आहोत. त्यात दगावलेले बाळ तिला पती आणि सासूने केलेल्या मारहाणीमुळे झाल्याचे निष्पन्न झाल्यास तिच्या पती आणि सासूला अटक करणार असल्याची माहिती तिरोडाचे पोलीस निरीक्षक देविदास कठाळे यांनी दिली.

# माजी आमदार संजय पुराम यांनी दत्तक घेतलेले फुटाना गाव विकासापासून वंचित

**देवरी:** गेल्या २०१४ ते २०१९ या काळात भाजपचे माजी आमदार संजय पुराम यांनी विकासाचा मोठा वाजा गाजा करीत फुटाना हे गाव दत्तक घेतले होते. मात्र, या गावात त्यांनी या काळात एकही विकास कामे केली नाही. नाव मोठे दर्शन खोटेचा प्रत्यय दिला. त्यामुळे या गावातील नागरीकांमध्ये पुराम यांच्या विरुद्ध रोष आहे. पण या गावातील नागरिकांच्या मागणीनुसार मी स्वत:संबंधित विभागाशी पाठपुरावा करुन सी.एम.जी.एस.वाय अंतर्गत फुटाना ते पल-ानगाव या रोडचे एकूण ५ कोटी ५८ लाख रुपयाचे तर ग्रामविकासाच्या निधीमध्ये ३० लाख रुपयाचे रोड व स्थानिक आमदार विकास निधीतून १५ लाख रुपयाचे रोड आणि १० लाख रुपयाचे समाज भवन व ३ लाख रूपयांची चावडी अशी विविध विकास कामे फुटाना या गावासाठी खेचून आणली. आज फुटाना येथील नागरिकांच्या रोड व रस्त्याची समस्या दूर केली तर या सर्व कामांचे भुमिपूजन आणि लोकार्पणाचे कार्य पूर्ण केले. अशाप्रकारे आम्ही हुर्दड आणि फोकनाड गोष्टी करित नाही तर विश्वासाने विकास कामे करतो, असे प्रतिपादन या क्षेत्राचे विद्यमान आमदार सहसराम कोरोटे यांनी केले. ते देवरी तालुक्यातील फुटाना या येथे गुरुवारी (दि.२४ ऑगस्ट ) रोजी आयोजित विविध विकास कामाचे भुमिपूजन, लोकार्पण व वृक्षारोपण सोहळ्यात अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते.



याप्रसंगी उपस्थित गोंदिया जिल्हा परिषदेचे गटनेते संदीप भाटिया, जि.प. सदस्य उषा शहारे, धरमगुडे, पं. स. सदस्य भारती सलामे, प्रल्हाद सलामे, फुटानाचे सरपंच कमलेश नंदेश्वर, उपसरपंच मीना देशमुख, माजी सरपंच नूतन बन्सोड, टेकचंद हिडको, माजी पं.स.सदस्य ओमराज बहेकार युवक कांग्रेसचे विधानसभाध्यक्ष दीपक कोरोटे, बळीराम कोटवार, पोलिस पाटील कृष्णा भोयर, प्रेमनाथ देशमुख, तंटामुक्ती अध्यक्ष गजानन गहाने, नेतराम बडवाईक, गजानन काकडे, तुलाराम कराडे, संदीप मोहबीया यांच्यासह फुटाना परिसरातील सर्व ग्रामपंचायत सदस्य कांग्रेस पक्षाचे कार्यकर्ता, महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार कोरोटे पुढे म्हणाले की, फोकनाड कामे करीत नाही आणी समाजात दुजाभाव न करता फक्त गोरगरीब सर्व सामान्य नागरीकांचे प्रश्न मागी लागले पाहिजे या साठी प्रयत्न करतो. पुढे केन्द्र सरकार वर हल्ला चढवित ते म्हणाले की, आज या देशात एवढ्या मोठ्या महागाईच्या परिस्थितीत घरगुती गँसचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. तर हे दर ४४० रुपये होते. आणि यामधून सबसिडीपण परत मिळायची. पण या भाजपच्या मोदी सरकारने ह्या सर्व सोई सुविधा बंद करुन गँस चे दर हे १२०० रुपयाच्यावर केलेला आहे. त्यामुळे सर्व माता भगिनी मध्ये केन्द्र सरकार विरुद्ध आक्रोश आहे असे म्हटले.

दरम्यान आयोजकांनी आमदार कोरोटे यांचा शाल व श्रीफळ भेट देऊन सत्कार केले. तसेच गावातील काही महिला पुरुषांनी निवेदन देऊन आणखी नव्या एका सभा मंडपाची मागणी केली. यावर आमदार कोरोटे यांनी सदर कामे लवकर पूर्ण करू अशी ग्वाही दिली.

# सांघिक खेळामुळे टिमवर्क बघावयास मिळते-मुकाअ अनिल पाटील




**गोंदिया:-** शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुदृढ आणि चांगले राहणं फार आवश्यक आहे. आणि त्यासाठी प्रत्येकाने आपल्या जीवनात काहीतरी छंद जोपासले पाहिजे. काहीतरी खेळ खेळत राहिले पाहिजे. खेळामुळे वैयक्तिक क्षमता काय आहे हे कळते तर सांघिक खेळामधून टिमवर्क बघावयास मिळते असे विचार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटिल यांनी पोलीसांच्या जिल्हास्तरीय क्रिडा समेंलनाच्या समारोपीय कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले. येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर तीन दिवसीय २२ व्या जिल्हास्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धा- २०२३ चे आयोजन दिनांक २३ ते २५/०८/२०२३ रोजी दरम्यान करण्यात आले होते.

पोलीस दलातील पोलीस अधिकारी- अंमलदार यांच्या अंगी खेळाडूवृत्ती जोपासली जावी, त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास व्हावा. दैनंदिन कर्तव्य पार पाडत असताना निर्माण होणाऱ्या अडीअडचणीच्या सततच्या ताणतणावातून काहीशी विश्रांती मिळावी, ताणतणाव कमी व्हावा या संकल्पनेतून पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांचे मार्गदर्शनात आयोजित जिल्हा क्रिडा स्पर्धेची मशाल अप्पर पो-लीस अधीक्षक अशोक बनकर यांच्या हस्ते प्रज्वलित करण्यात आली. जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धेत सहा प्रकारचे सांघिक क्रिडा स्पर्धा आणि सहा प्रकारच्या वैयक्तिक क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्यात. त्यात प्रामुख्याने तीन दिवसात सांघिक क्रिडा प्रकारात फूटबॉल, व्हॉलीबॉल, हँडबॉल, बास्केटबॉल, हॉकी, कब्बडी तसेच वैयक्तिक क्रिडा प्रकारात १००, २००, ४०० व ८०० मिटर धावणे, गोळाफेक, लांबउडी, भाला फेक, थाळी फेक, इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या.

समारोप कार्यक्रम प्रसंगी गोंडी नृत्याचे उत्कृष्ठ आयोजन करण्यात आले होते. तसेच पोलिसांच्या कुटुंबीयांसाठी संगीत खुर्चीचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. तर पोलीस पाल्य, कार्यालयीन लिपिक यांचेसाठी धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर समारोप कार्यक्रम पार पडला.

संगीत खुर्चीमध्ये श्रीमती- अनिता मडावी, कार्यालयीन लिपिक यांनी प्रथम , सौ. रंजना कोरचे द्वितीय, तर सौ.कविता अडमाचे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. पोलीस पाल्य मुले-मुली यांच्यासाठी ५० मिटर धावण्याची स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये मुलांमध्ये प्रथम- अथर्व मैंद, द्वितीय अभिषेक राऊत, तृतीय संकल्प राऊत तर मुलीं मध्ये कुमारी अनुश्री सपाटे प्रथम कुमारी जिज्ञासा वाडीवे द्वितीय तर झनईशा कुसराम तृतीय क्रमांक मिळवला.

या क्रिडा स्पर्धेत गोंदिया, आमगाव, तिरोडा, देवरी उपविभाग व पोलीस मुख्यालय अशा एकूण पाच विभागांचे संघ सहभागी झाले होते. पोलीस मुख्यालयाच्या महिला संघाने तर आमगाव विभाग पुरुष संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. बेस्ट अ‍ॅथलेटिक्स पुरुषमध्ये-पोलीस अमलदार - नंदू बेलपांडे, तिरोडा विभाग तर बेस्ट अ‍ॅथलेटिक्स महिला यामध्ये मपोशि-गायत्री बरेजू, देवरी विभाग यांनी पदक मिळवले. सर्वच विजेते उत्कृष्ठ महिला खेळाडू व पुरुष खेळाडू यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, ट्रॉफी व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

या क्रिडा स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा शुक्रवार दिनांक- २५ आँगस्ट रोजी पोलीस कवायत मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेसाठी गोंदिया,आमगाव, तिरोडा, देवरी उपविभाग व पोलीस मुख्यालय पोलीस स्टेशनचे पोलीस खेळाडूंनी सहभाग घेतला होता. सदरच्या क्रिडा स्पर्धेमध्ये गोंदिया जिल्ह्यातील १२५ पो-लीस अमलदार व साधारण २० पोलीस अधिकारी यांनी क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कलागुणांच्या प्रदर्शन केले. स्वतः अप्पर पोलीस अधीक्षक यांनी प्रमुख पाहुणे म्हणुन लाभलेले अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी, पोलीस निरीक्षकांनी पोलीस अमलदारांसोबत रस्साखेच क्रीडा प्रकारात सक्रिय सहभाग नोंदवला. स्वतः अपर पोलीस अधीक्षक, प्रमूख पाहुण्यासह रस्साखेच खेळामध्ये सहभागी झाल्याने पोलीस अमलदारांमध्ये खेळाडू मध्ये प्रचंड उत्साह पाहावयास मिळाला.

क्रिडा स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद गोंदिया चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटिल लाभले होते. तर अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, किशोर परवते , प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) पो.नि.श्रीमती नंदिनी चांनपुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# वन विभागाची कारवाई ; अवैध सागवन साठा जप्त

## वन परिक्षेत्र गोठणगांव क्षेत्रातील बोरटोला येथील घटना



**अर्जुनी मोरगाव :-** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील जिल्ह्याच्या अखेरच्या टोकावर असलेल्या मौजा बोरटोला येथिल एका घरातून अवैध सागवन साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई ( ता.२६ ) सकाळी ६.३० ते ७ दरम्यान करण्यात आली.अवैध सागवन साठयासह ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव संजय ताराचंद मडावी रा. बोरटोला असे आहे.

वनपरिक्षेत्र कार्यालय गोठणगाव अंतर्गत येत असलेल्या सहवनक्षेत्र तिरखुरी बिट तीरखुरी १ येथील बोरटोला येथे अवैध सागवान असल्याची गुप्त माहिती वनविभागाला प्राप्त झाली त्या आधारे (ता.२६) सकाळी ६.३० च्या सुमारास उपवनसंरक्षक वन विभाग गोंदिया तसेच प्रकाष्ट निष्कासन अधिकारी नवेगाव बांध यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी विजय तेलंग यांनी आपल्या कर्मचाऱ्यासह घटनास्थळ गाठुन कारवाई केल. कारवाई दरम्यान ०.२४६ घ.मी.१९ नग अवैध सागवान आढळून आला तो सर्व मौल्यवान सागवन चिरान जप्त करून वन विभागाच्या कार्यालयात जमा करण्यात आला.पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी विजय तेलंग करत आहेत.

# २०१९ मध्ये शिवसेनेची सोबत चालली तर आता विरोध का-खा.प्रफुल पटेल

## पवार कुटुबांतील त्या व्यक्तीने आमच्या घरीच रहावे, जयंत पाटील आमच्यासोबत आले तर त्यांचे स्वागतच





**गोंदिया :** राज्यातील सन २०१९ च्या निवडणुकीत जनतेने काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला स्पष्ट बहुमत दिले नव्हते. तेव्हा जनतेने विरोधात बसण्याचा जनादेश दिला होता. मात्र तेव्हा राज्याच्या विकासासाठी कट्टरवादी असलेल्या शिवसेनेशी (ठाकरे) आघाडी करुन सत्तेत सहभागी होण्यात काहीच गैर नाही वाटले नाही. मग आम्ही सुद्धा राज्याच्या विकासासाठी युतीत सहभागी झालो मग आता विरोध का केला जात आहे, असा सवाल खा. प्रफुल्ल पटेल यांनी विरोधकांचे नाव न घेता केला.

गोंदिया जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन गुरुवारी (दि.२४) नमाद महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. खा. पटेल म्हणाले युतीत सहभागी होण्याचा निर्णय आम्हा एक दोन नेत्यांचा नव्हता तर संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेसचा होता. आजही आमच्या सोबत पक्षाच्या ५३ पैकी ४३ आमदार अधिकृतपणे व पदाधिकारी आणि कार्यकर्ते आमच्यासोबत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस नेमकी कुणाचा यावर निवडणूक आयोगाचा निर्णय लवकरच येणार असून त्यानंतर सर्व चित्र स्पष्ट होईल. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोणत्या गटाची बाजू भक्कम आहे आणि कोणासोबत किती जण हे देखील स्पष्ट होईल असे देखील पटेल यांनी सांगितले.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाची प्रगती मागील ९ वर्षात देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात प्रगती साधली आहे. जगात आज भारताचे नाव आदराने घेतले जाते. भारताने सर्वच क्षेत्रात प्रगती साधली असून देशाने त्यांचे नेतृत्व मान्य केले आहे. आम्ही सुद्धा विकासासाठी एनडीएसोबत असून आगामी निवडणुकीत जास्तीत एनडीएचे उमेदवार निवडून आणण्याचा संकल्प केल्या असल्याचे खा. पटेल यांनी सांगितले.

### मी निवडणुकीच्या रिंगणात आहे किंवा नाही हे वेळच ठरवेल

**मी राज्यसभेचा सन २०२८ पर्यंत खासदार आहे. त्यामुळे २०२४ ची निवडणूक लढवायची की नाही याचा निर्णय मी आता जाहीर करणार नाही. आता आम्ही युतीत सहभागी झालो असून तिन पक्षांच्या बैठकीत जो निर्णय होईल तो आम्हाला मान्य राहील. यावेळी जो उमेदवार ठरेल त्याच्या पाठीशी भक्कपणे उभे राहू. मी निवडणुकीच्या रिंगणात आहे किंवा नाही हे वेळच ठरवेल.**

### पवार आणि पटेल कुटुंब एकच

**खा. शरद पवार यांच्याशी वैचारिक मतभेद असू शकतात. पण कौटुंबिक प्रेम आणि जिव्हाळा आजही कायम आहे व तो यापुढेही कायम राहिल. यात कसलीही कटुता येणार नाही कारण पवार आणि पटेल यांच कुटुंब एकच आहे. आ. रोहित पवार हे गोंदिया-भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. यामुळे वेगळीच चर्चा आहे. त्यांनी खुशाल या जिल्ह्यात यावे, त्यांनी माझ्याच घरी थांबावे. भलेही ते बाहेर जावून माझ्या विरोधात बोलले तरी मला चालले, याला माझी कसलीही हरकत नसणार असे खा. पटेल म्हणाले. सोबतच जयंत पाटील यांच्या पक्षप्रवेशाबद्दल जी चर्चा सुरु आहे,त्यावर बोलतांना त्यांचे आमच्या पक्षात स्वागत आहे.त्यांनी नक्की यावे.परंतु ते सुध्दा प्रदेशाध्यक्ष असल्याने त्यांच्या मनात काय हे सांगता येणार नसल्याचे म्हणाले.**

# ९ वर्षांत मोदीमुळे भारताची प्रतिमा सर्वत्र उजळली-चंद्रशेखर बावनकुळे



**गोंदिया:** पंतप्रधान नरेंद्र मोंदीमुळे मागील ९ वर्षात भारताची प्रतिमा जगभर उजळली. केंद्र सरकारने राबविलेल्या जनकल्याणाच्या योजनामुळे जनसामान्यांना लाभ झाला. यामुळे येत्या निवडणुकीत मोदींनाच पंतप्रधान होण्यासाठी समर्थन देऊ असा निर्धार भंडारा-गोंदिया येथील नागरिकांनी केला असल्याचे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुडे यांनी केले.

भाजपच्या जनसंवाद यात्रेअंतर्गत भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राच्या दौऱ्यावर भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुडे शनिवारी गोंदिया येथे आले होते. यावेळी ते बोलत होते. आगामी विधानसभा निवडणुकीपर्यंत लोकसभा क्षेत्रातील सर्व विधानसभा क्षेत्रात ६०० कार्यकर्ते दररोज घर चलो अभियान राबविणार आहेत. भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील साडेतीन लाख कुटुंबापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न भाजपा कार्यकर्त्यांचा असावा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

सायंकाळी गोंदिया येथे गांधी प्रतिमा ते गोरेलाल चौकापर्यंत संपर्क ते समर्थन अभियानात सहभागी झाले. गोंदिया येथे तिरोडा, अर्जुनी मोरगाव व गोंदिया विधानसभा क्षेत्रातील भाजपा कार्यकर्त्यांशे संवाद साधला व मार्गदर्शन केले. यावेळी संयोजक बाळा भेगडे, विदर्भ संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, माजी आ. परिणय फुके, प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे, धर्मपाल मेश्राम, भंडारा-गोंदिया लोकसभा प्रमुख बाळा अंजनकर, खा. सुनील मेंढे,गोंदिया भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. येशूलाल उपराडे, जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले,भंडारा-गोंदिया लोकसभा निवडणूक प्रमुख विजय शिवणकर,आमदार विजय रहांगडाले, माजी आमदार गोपाल अग्रवाल, अनुप ढोके, संजय कुळकर्णी उपस्थित होते.

### वडेट्टीवारांना दाखविण्यासाठी बोलावेच लागते

विजय वडेट्टीवार हे आता काँग्रेसचे नवीन विरोधी पक्षनेते झाले आहेत. त्यामुळे त्यांना बोलावेच लागते. काँग्रेस पक्षामध्ये सध्या स्पर्धा सुरु आहे. त्यामुळे कोण जास्त बोलतात हे काँग्रेसच्या केंद्रीय नेतूत्वाला दाखविण्यासाठी ते बोलतात. त्यामुळे यात काही फारसे मनावर घेण्यासारखे नाही, असा टोला भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी लगावला.

# संतप्त शेतकऱ्यांचे आमदार अग्रवालांच्या कार्यालयापुढे केले "ठिय्या' आंदोलन सुरूच




**गोंदिया:-**शासकीय धान खरेदी केंद्रावर धान विक्री करुन अडीच महिन्याचा कालावधी लोटूनही रक्कम मिळाली नसल्याने व वारंवार जिल्हा पणन कार्यालयाचे उंबरठे झिजवूनही अधिकारी, लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी २८ ऑगस्ट रोजी थेट स्थानिक आमदार विनोद अग्रवाल यांच्या कार्यालयापुढे "ठिय्या' आंदोलन करत शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधीं विरोधात घोषणा दिल्या.हे आंदोलन दुसऱ्या दिवशीही वृत्तलिहेपर्यंत सुरुच होते.

या आंदोलनाची दखल खासदार प्रफुल पटेल यांनी घेत मुंबई मंत्रालयात सदर विषयावर तातडीची बैठक आयोजित करुन समस्या निकाली काढण्याच्या सुचना संबंधित विभागाच्या सचिवांना दिल्या.

गोंदिया तालुक्यातील चुटीया येथील श्रीराम अभिनव धान खरेदी संस्थेला शासकीय धान खरेदी करण्याची परवानगी जिल्हा पणन कार्यालयाने दिली. या केंद्रावर चुटियासह परिसरातील शेकडो शेतकऱ्यांनी जून महिन्यात उन्हाळी हंगामातील हजारो क्विंटल धान विक्री केले. विक्री केलेल्या धानाची रक्कम आठवडाभरात शेतकऱ्यांच्या बँक खत्यात जमा होणे अपेक्षित होते. मात्र अडीच महिने लोटूनही रक्कम जमा झाली नाही. चुटियाच्या संस्थेच्या गोदामात खरेदी केलेला धान उपलब्ध नसल्याने रक्कम थांबविण्यात आल्याचे सांगितले जाते. जिल्हा प्रशासनाने नियमाने संस्थेवर कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र शेतकऱ्यांची चूक नसताना विनाकारण शेतकऱ्यांची अडवणूक केली जात असल्याचा प्रकार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणने आहे. श्रीराम अभिनव संस्थेत १६ हजार ५०० क्विंटल धान उपलब्ध नाही. या केंद्रावर धान विक्री करणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये अडवून ठेवण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्याकडे न्यायाची हाक दिली. मात्र त्याच्या कष्टाचा पैसा त्यांना मिळाला नाही. खरीपाची लागवड केली. मजूरी, ट्रॅक्टर भाडा, खते, बियाणे, किटकनाशके यांची रक्कम देणे असल्याने २८ जुलै रोजी काही शेतकऱ्यांनी जिल्हा पणन अधिकारी यांचे कक्ष गाठले. त्यांना रकमेसंदर्भात विचारणा केली. मात्र त्यांच्याकडून शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. दरम्यान लोधीटोला येथील संतप्त शेतकरी दीपक कंसरे यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला होता. स्वातंत्र्यदिनापर्यंत रक्कम जमा न झाल्यास आत्मदहन करण्याचा पावित्रा शेतकऱ्यांनी घेतला होता.

त्यावेळी स्थानिक आमदार विनोद अग्रवाल यांनी मध्यस्थी करीत २७ ऑगस्टपर्यंत रक्कम मिळवून देण्याची ग्वाही शेतकऱ्यांना दिली होती. या कालावधीत शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा न झाल्याने सोमवारी सकाळी ११ वाजे चुटीया, तांडा, लोढीटोला, ढाकणी, मुर्री, पिंडकेपार, नवेगाव, पांढराबोडी, सोनेगाव खुर्द, भागवत टोला, गंगाझरी आदी अनेक गावातील शेकडो शेतकऱ्यांनी आ. अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयावर धडक दिली. यावेळी शासन, प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्या विरोधात तीव्र घोषणबाजी केली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून आंदोलनस्थळी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता.

### फेडरेशन सोडून माझ्या कार्यालयासमोर आंदोलन का?

**माझ्या विधानसभा क्षेत्रातील शेतकरी अडचणीत राहू नये यासाठी मी मार्केटिंग अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पोलिस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु, आरोपींना पकडण्याचे काम पोलिसांचे आहे. त्यांनी आरोपींना शोधावे. मी जनतेचा आमदार आहे. लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी मी तत्पर आहे. तुमचे माझ्यावर पैसे नाहीत असतील तर ते मी आताच परत करतो. तुमचे पैसे सरकारवर आहेत, त्यासाठी मार्केटिंग अधिकाऱ्यांच्या किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर आंदोलन करा मी स्वत: तुमच्यासोबत आहे.**

**- विनोद अग्रवाल, आमदार**

# निधी वाटपात ककोडी क्षेत्रावर अन्याय



**देवरी:** जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा शुक्रवार २५ ऑगस्ट रोजी डॉ.डीपीसी हॉलमध्ये पार पडली. जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ मध्ये विविध विभागाचे नियोजन जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात आले. मात्र, ककोडी जिल्हा परिषद क्षेत्रावर निधीवाटपामध्ये अन्याय झाल्याचा आरोप जिल्हा परिषद सदस्य उाषा शहारे यांनी केला आहे.

महिला व बाल कल्याण विभागात कोट्यावधीचे निधी असून आपल्याच क्षेत्रात नवीन अंगणवाडी आणि दुरुस्ती घेऊन दुसऱ्या क्षेत्रांना वगळण्यात आले. १३ वित्त आयोगातील २ कोटमध्ये १७ अंगणवाडी, त्याचबरोबर २०२३-२४ मध्ये १०२ कोटी मधून ४१ दुरुस्त्या,३ कोटी ६२ ६२ लक्ष ४ हजार रुपयांमधून ३१ नवीन आंगणवाडीचे नियोजन करण्यात आले. परंतु या नियोजनात ककोडी जि.प. क्षेत्रातील अंगणवाडीच्या मुलांवर त्यांच्या भौतिक सुखसुधीवेर अन्याय करण्यात आला. ककोडी क्षेत्रात अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांची पटसंख्या १५०० च्यावर आहे. यामध्ये एकूण ४९ अंगणवाडी पूर्ण आहेत. त्यामध्ये १ हे नियमित आहेत. आणि ८ मिनी अंगणवाड्यामधून ४ अंगणवाड्यांचे मुले दुसऱ्यारच्या चावळीत बसतात. १० च्यावर दुरुस्तीच्या अंगणवाड्या आहेत. मुले पावसाच्या दिवसात तिथे बसू शकत नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभागाकडे ककोडी क्षेत्रासाघी नियमित सुपरवायझर देण्यात यावे, मुलांच्या भौतिक सुविधेकडे लक्ष द्यावे अशी मागणी केली. परंतु क्षेत्राच्या मागणीकडे मुद्दाम दुर्लक्ष करण्यात आले. त्याचबरोबर आरोग्य विभागात सेवा देणारे आरोग्य कर्मचाऱ्यांचा ८ सदनिका (क्वार्टर) दुरुस्ती करण्याची लिखीत मागणी येथील कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी केली. लेखी स्वरूपात येथील ८ पैकी ७ क्वाटंरची दुरवस्था झाली आहे. एक समाधानकार चांगली आहे. परंतु आरोग्य विभागाने सुद्धा २०२३-२४ च्या नियोजनात २.९४ कोटी, आदिवासी उपाययोजनामधून ४५ लाख असा एकूण ३.३९ कोटींचा निधीचा नियोजन करुन ककोडी क्षेत्रातील फक्त ३ लाख रुपये भीक म्हणून दिले का? असा प्रश्न उषा शहारे यांनी उपस्थित केला. त्या म्हणाल्या की, महिला बालकल्याण विभागात कोट्यावधी निधी असून ककोडी क्षेत्रातील गरजू विद्यार्थीच्या सुखसुविधेसाठी एकही निधी दिलेला नाही. आरोग्य विभागाने तर इतर सदस्यांना त्यांच्या मनाप्रमाणे निधी वाटप केला. परंतु ककोडी क्षेत्रावर अन्याय केला आहे.

# काँग्रेसचे पदाधिकारी अपघातात थोडक्यात बचावले



**गोरेगाव:** वाहनावर अचानक रानडुकरांचा कळब धडकल्याने वाहनातून प्रवास करनारे काँग्रेसचे पदाधिकारी थोडक्यात बचावल्याची घटना गोंदिया-कोहमारा मार्गावरील मिलटोलीजवळ सोमवारी (दि.२८) सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास घडली. सुदैवाने यात कुठलीही जीवीतहानी झाली नाही.

प्राप्त माहितीनुसार काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वात ३ सप्टेंबरपासून भंडारा व गोंदिया जिल्ह्यातून संवाद पदयात्रेला सुरुवात होत आहे. या संवाद पदयात्रेच्या तयारीच्या अनुषंगाने आढावा घेणयासाठी काँग्रेसचे भंडारा-गोंदिया प्रभारी नाना गावंडे, जिया पटेल, बाळ कुळकर्णी, राजा तिडके, राजू पालीवाल हे सोमवारी गोंदिया-भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. दरम्यान या पदाधिकाऱ्यांनी भंडारा येथे बैठक घेवून गोंदिया येथील बैठकीसाठी इनोव्हा क्रमांक एमएच ४०,७२१० ने भंडाऱ्याहून गोंदियासाठी रवाना झाले.

दरम्यान, गोंदियापासून ८ किमी अंतरावर असलेल्या मिलटोलीजवळ अचानक रानडुकरांचा कळब इनोव्हावर येऊन धडकला. वाहनचालकाने गाडी नियंत्रीत करण्याचा प्रयत्न केला. पण एक रानडुक्कर गाडीच्या चाकावर येऊन धडकले. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला उलटणार तोच वाहनचालकाने नियंत्रीत केले आणि मोठी दुर्घटना टळली. या अपघातात नाना गावंडे, जिया पटेल व राजू पालीवाल हे किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिय!ाच काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोङ यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचत दोन वाहने बोलावून पदाधिकाऱ्यांना गोंदिया येथील विश्रामगृहात पोहोचविले. या अपघातामुळे नियोजित बैठक लवकरच आटोपण्यात आल्याची माहिती आहे.

# पोलिस पाटील पदभरती अधिक पारदर्शक आणि शिस्तबद्ध असेल-वरुणकुमार शहारे




**अर्जुनी-मोरगाव:** नुकत्याच आरक्षण सोडत झालेल्या पोलिस पाटील पदांच्या अर्ज सादर करण्याच्या तारिख व भरती प्रक्रियेबाबत वेगवेगळ्या चर्चा अर्जुनी मोरगाव उपविभातील गावांगावामध्ये सुरूआहेत. यावर विश्वास न ठेवता उपविभागीय कार्यालयाच्या निर्देशानुसार येत्या काही दिवसांत जाहिरामा प्रसिद्ध केल्यानंतर पदभरतीचा कार्यक्रम जाहीर करून पारदर्शक आणि शिस्तबद्धपणे राबविली जाईल असे मत उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलीस पाटील पदे रिक्त असता कामा नये यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने उपविभाग गोंदिया तिरोडा देवरी व अर्जुनी मोरगाव यांच्या अधिनस्त पोलीस पाटील संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया २७ ऑगस्ट २०२३ पत्राद्वारे निर्देश दिले होते.

त्यानुसार दिनांक २१ ऑगस्ट २०२३ रोजी तहसील कार्यालयाच्या सभागृहात बिंदू नामावली मंजूर करुन आरक्षणानुसार पदसंख्या व पदभरतीच्या अनुषंगाने आरक्षण काढण्यात आले. अर्जुनी मोरगाव उपविभागीय कार्यालय अंतर्गत अर्जुनी मोरगाव आणि सडक अर्जुनीतील एकूण ९५ पदाकरिता आरक्षण सोडत घेण्यात आली त्यातील जवळपास २५ गावातून काढलेल्या आरक्षणावर हरकत घेण्यात आली आहे. अजून पर्यन्त जाहिरामा प्रसिद्ध करण्यात आला नसला तरी उमेदवारांमध्ये अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेसंदर्भात संभ्रम पसरविला जात होता. जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या पोलीस पाटील पद भरती कालबद्ध कार्यक्रमाच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये पोलीस पाटील पदाकरिता अर्ज करण्याच्या आणि अखेरच्या तारखेबाबत सोशल मीडिया अनेक अफवा पसरवण्यात आल्या त्यानुसार आज निवड समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी वरणकुमार शहाणे यांच्याशी चर्चा केली असता अजून पर्यंत पोलीस पाटील पदाकरिता काही तांत्रिक बाबीमुळे जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आलेला नाही. लवकरच जाहीरनामा काढण्यात येईल त्यानंतरच प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होईल नागरिकांनी आणि उमेदवारांनी कुठल्याही भूलथापा आणि अफवांवर विश्वास ठेवू नये. अनेक वर्षांपासून अर्जुनी मोरगाव उपविभागीय कार्यालयाच्या अंतर्गत गावांमध्ये जवळपास ६० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त असल्यामुळे गावागावात पोलीस पाटील पदाबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता भरली आहे. उपविभागीय कार्यालयाच्या ४० ते ५० कि.मी. पर्यंत दूर असणाऱ्या गावातील उमेदवारांना ऑफलाइन अर्ज प्रक्रिया असल्यास कार्यालयात ये - जा करावी लागेल त्या अनुषंगाने यात अधिक पारदर्शकता असावी आणि उमेदवाराणा त्रास होऊ नये या हेतूने जाहीरनामा निघाल्यानंतर पोलीस पाटील पदाबाबत अर्ज करण्याची प्रक्रिया ही संगणकीकृत ऑनलाईन पद्धतीची असेल असेही उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे यांनी सांगितले.

२१ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निर्देशानुसार घेण्यात आलेल्या आरक्षण सोडत सभेमध्ये जवळपास २५ गावातील नागरिकांनी निघालेल्या आरक्षणावर हरकत घेतली. अनेक नागरिक अमुक जातीचा आपल्या गावात माणूसच नाही त्याचा आरक्षण कसं निघालं? याबाबत नागरिकांमध्ये वेगवेगळ्या चर्चा होत्या त्यावर, उपविभागीय कार्यालयाच्या वतीने सुरुवातीला जाहीरनामा प्रसिद्ध करुन अर्ज मागविण्यात येणार आहे, ठरलेल्या आरक्षणाचा उमेदवार त्या गावात उपलब्ध न झाल्यास किंवा ज्या ठिकाणाहून अर्ज येणार नाहीत. त्या ठिकाणी पोलीस पाटील पदांसाठी आरक्षण दिनांक १६ ऑक्टोबर २००८ च्या शासन निर्णयानुसार नव्याने आरक्षण ठरवून पोलीस पाटील पदांची भरती प्रक्रिया एकत्र राबवली जाणार आहे.

# दरोडा घालणाऱ्या ४ गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केले जेरबंद

गोंदिया-देवरी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या देवरी शहरातील अग्रसेन चौकात उभ्या असलेल्या ट्रकचालकाकडून ट्रकची चाबी हिसकावून पैसे घेऊन फरार होणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीतील चौघांना गोंदिया स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २८ ऑगस्ट रोजी जेरबंद केले आहे.

सविस्तर असे की, तक्रारदार फिरोज खान गुलाम हुसेन खान राहणार खोलापूर तालुका-भातकुली, जिल्हा अमरावती हे त्यांची ताब्यातील ट्रकने कृषी उद्योग कंपनी मधून खताची थैल्या ट्रकमध्ये भरून अमरावती वरून नागपूर- रायपूर- हायवे नी देवरी ला येऊन थांबले व ट्रकचे केबिनमध्ये जेवण करीत असताना २३ ऑगस्ट रोजी रात्री २२.०० वा ते २२.३० वा दरम्यान चार अनोळखी इसमानी तोंडाला काळी रुमाल बांधून गाडीचे केबिनमध्ये चढून फिर्यादी कडील ट्रकची जबरीने चावी घेऊन ट्रक रायपूरचे दिशेने फिर्यादीसह घेवून गेले. भरेगाव जवळील हायवे रोडवर ट्रक थांबवून चाकूचा धाक दाखवून दुखापत केली. तसेच फिर्यादी कडील २८००/- रू व ट्रकची चाबी हिसकावून घेतले. तसेच देवरी येथे थांबलेल्या फिर्यादीचे भावाकडून ईतर चार अनोळखी ईसमांनी नगदी ५५००/- जबरीने हिस्कावले अश्याप्रकारे ८ अनोळखी आरोपींनी ८३००/ - रु. नगदी जबरीने हिसकावुन नेल्याने फिर्यादीचे तक्रारीवरून पोलीस ठाणे देवरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी सदर गुन्ह्याच्या गांभीर्य लक्षात घेता सदर गुन्ह्यातील दरोडा घालणाऱ्या गुन्हेगारांचा तात्काळ शोध घेऊन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत ठाणेदार पोलीस ठाणे देवरी, तसेच पो. नि. स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया यांना निर्देशीत केले होते.त्या अनुषंगाने आदेशाप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश लबडे,पो. नि. प्रवीण डांगे यांचे मार्गदर्शनात दरोडा घालणाऱ्या गुन्हेगारांच्या शोधाकरीता पो. ठाणे देवरी, तसेच स्था. गु. शा.ची वेगवेगळी पथके तयार करून रवाना करण्यात आली होती.

सदर गुन्हयाच्या घटनास्थळाचे भौतिक पुरावे,सी.सी.टी.व्ही फुटेज व फिर्यादीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे फिर्यादीच्या जागी यापुर्वी नोकरी करत असलेला इसम नामे युसुफ खान रा. अमरावती याने केल्याची शंका आली. त्यानुसार तपास केला असता,सी.सी.टी.व्ही फुटेज, तांत्रिक माहितीच्या आधारे दरोडा घालणारे आरोपी नामे सलमान नियामत खान वय २० वर्षे, पत्ता- हनुमान नगर हैदरपुरा, शकील किराणा दुकान जवळ, अमरावती,मोहम्मद खान समीउल्ला खान वय २८ वर्षे, पत्ता- लालखडी, रींग रोड, नवसारी अमरावती, मोहम्मद शोहेब मोहम्मद शब्बीर वय २७ वर्ष, पत्ता नालसाहेबपुरा, अमरावती, शेख तौफीक शेख मुस्ताक वय २४ वर्षे पत्ता लालखडी चौक बिस्मील्ला नगर, जि. अमरावती,शेख नदीम शेख नबी पत्ता-सावंगी, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती व शेख युसुफ शेख अन्नु पत्ता- आलीमनगर अमरावती यांचा दरोडयात सहभाग असल्याची खात्री झाली.त्यानुसार दिनांक २८/०८/२०२३ रोजी यातील आरोपी साहील खान उर्फ शेख तोसीफ शेख मुस्ताक वय २४ रा. लालखडी चौक बिस्मिल्ला नगर, जिल्हा अमरावती यास पोउपनी विघ्ने यांचे पथकाने तुमसर भंडारा येथून ताब्यात घेतले. तसेच सपोनि विजय शिंदे, यांचे पथकाने आमरावती येथे रवाना होवून आरोपी सलमान नियामत २० वर्ष, पत्ता- हनुमान नगर हैदरपुरा, शकील किराणा दुकान जवळ, अमरावती,मेहबुब खान खान वय २८ वर्ष, पत्ता- लालखडी, रंग रोड, नवसारी अमरावती व मोहम्मद शाहेब मोहम्मद शब २७ वर्ष, पत्ता- नालसाहेबपुरा, अमरावती यांना अमरावती येथून वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेतले.

त्यांचेकडे चौकशी केली असता,सदर गुन्हा शेख युसुफ शेख अन्नू याचे सांगण्यानुसार केल्याची कबुली दिली. युसुफ खान हा मालक नामे मुजीब रहमान यांचे ट्रकवर सदर गुन्हयातील फिर्यादी फिरोज गुलाम हुसेनखा वय ३८ वर्षे यांचे जागेवर पुर्वी चालक म्हणुन नोकरी करत होता. फिर्यादी फिरोजखा यास त्याचे विरूद्ध मालकाचे कान भरल्याने नोकरीवरून काढले होते याचा राग त्याचे मनात होता. यासाठी कट करून सदरचा गुन्हा शेख युसुफ शेख अन्नू याने त्यांना करायला सांगितला असे त्यांनी सांगीतले. आरोपी यांचे ताब्यातून १२०० रूपये रोख मिळून आले सदर पैसे फिर्यादी कडून जबरदस्तीने घेतल्याचे त्याने सांगीतले. तसेच त्याचे ताब्यातील टाटा इंडीगो वाहन क्र एम एच २७ ए सी ६२६२ हस्तगत करण्यात आले. पुढील तपास देवरी पोलीस करीत आहेत.

# फत्तेपूर-ओझाटोला रस्त्याची २४ तासात दुरूस्ती

**गोंदिया :** फत्तेपूर-ओझाटोला रस्त्याची दुरवस्था झाली होती. फत्तेपूर गावाजवळील नाल्यापासून सदर रस्ता पूर्ण खचून गेला होता. यामुळे वाहतूक प्रभावित होवून नागरिकांना फटका बसत होता. तसेच नजिकच्या डोंगरगाव येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक नुकसानीला समोर जावे लागत होते. या संदर्भात मुख्याध्यापक व विद्यार्थिनींनी सामाजिक कार्यकर्ता धनंजय रिनायत यांना या प्रकाराची माहिती दिली. यावर रिनायत यांनी आपल्यास्तरावर पाठपुरावा केला. यामुळे सदर रस्त्याची २४ तासात दुरूस्ती करण्यात आली आहे.

फत्तेपूर-ओझाटोला रस्ता दुरवस्थेला आला आहे. या रस्त्यावर फत्तेपूर गावाजवळ असलेल्या नाल्यापासून रस्ता खचून गेला होता. यामुळे वाहतूक प्रभावित होवून नागरिकांसह, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठा फटका बसला होता. फत्तेपूर येथून उच्चशिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नजिकच्या शाळा, महाविद्यालयामध्ये जातात. पण रस्ता पूर्ण खचल्याने समस्या निर्माण झाली होती. त्यातच नजिकच्या डोंगरगाव येथील राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात फत्तेपूर येथून जवळपास ७५ विद्यार्थिनी शिक्षणासाठी जातात. या विद्यार्थी कोंडी होवून शैक्षणिक नुकसान होत होते. विद्यार्थिनींनी याची माहिती मुख्याध्यापकांना दिली. यावर मुख्याध्यापक यांनी सामाजिक कार्यकर्ता धनंजय रिनायत यांना या प्रकाराची माहिती दिली. रिनायत यांनी तत्काळ या संदर्भात दखल घेत आपल्यास्तरावर पाठपुरावा केला. दुरवस्थेला आलेल्या रस्त्याची अवघ्या २४ तासात डागडुजी करून वाहतुकीस मोकळा केला. २४ तासात सदर मार्ग दुरूस्त करून दिल्याबद्दल विद्यार्थीनी धनंजय रिनायत यांचे आभार मानले.